**RELIANCE**
Infrastructure

## सभासदांना सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडच्या (''कंपनी'') सभासदांची ८८वी वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार, दिनांक २६ सप्टेंबर २०१७ रोजी १२ वाजता किंवा त्याच दिवशी बोलावण्यात आलेल्या रिलायन्स कॅपिटल लिमिटेडची वार्षिक सर्वसाधारण सभा संपल्यानंतर लगेचच, यापैकी जे उशिरा घडेल त्यावेळी, बिर्ला मातोश्री सभागृह, १९, न्यू मरिन लाईन्स, मुंबई ४०० ०२० येथे, सूचनेत उल्लेख केलेले कामकाज पार पाडण्यासाठी आयोजित करण्याचे निश्चित करण्यात आलेले आहे.

अन्य बाबींबरोबरच वार्षिक सर्वसाधारण सभेत पार पाडावयाच्या कामकाजाबद्दल माहिती देणारी सूचना, ३१ मार्च २०१७ रोजीनुसारचा संक्षिप्त ताळेबंद, त्याच तारखेला संपलेल्या आर्थिक वर्षासाठीचे संक्षिप्त नफा-तोटा पत्रक आणि रोकड प्रवाह विवरण, त्यावरील स्वतंत्र लेखापरीक्षकांचा अहवाल आणि एकत्रित संक्षिप्त वित्तीय विवरणासहित संचालक मंडळाचा अहवाल आणि रिमोट ई-व्होटिंग प्रपत्र यांच्या सहित संक्षिप्त वार्षिक आहवाल कंपनीच्या सभासदांना पाठविण्यात येत आहे.

वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेत उल्लेख केलेले कामकाज रिमोट ई-व्होटिंगच्या माध्यमातून तसेच सभेच्या ठिकाणी करावयाच्या मतदानाच्या माध्यमातून पार पाडले जाऊ शकेल. ज्या सभासदांनी त्यांचे ई-मेल पत्ते नोंदविलेले आहेत, त्यांना वार्षिक अहवाल आणि रिमोट ई-व्होटिंग प्रपत्रेही इलेक्ट्रॉनिक माध्यमातून पाठविलेली आहेत. ज्या सभासदांनी त्यांचे ई-मेल पत्ते अजूनही नोंदविलेले नाहीत, त्यांनी त्यांच्या इलेक्ट्रॉनिक होल्डिंगच्या बाबतीत ते त्यांच्या संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपंटच्या माध्यमातून डिपॉझिटरीकडे नोंदवावेत अशी विनंती करण्यात येत आहे. ज्या सभासदांनी प्रत्यक्ष रूपात भाग धारण केलेले असतील, त्यांनी त्यांचे ई-मेल पत्ते कारवी कॉंप्युशेअर प्रायव्हेट लिमिटेड (''कारवी''), कंपनीचे निबंधक आणि भाग हस्तांतरण अभिकर्ता यांच्याकडे नोंदवावेत अशी विनंती त्यांना करण्यात येत आहे.

**वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहून मतदान करण्यास पात्र असलेल्या सभासदांना त्यांच्या स्वत:ऐवजी सभेस उपस्थित राहून मतदान करण्यासाठी प्रतिनिधी नियुक्त करण्याचा हक्क असेल आणि असा प्रतिनिधी कंपनीचा सभासद असण्याची आवश्यकता नाही. परंतु प्रतिनिधी नियुक्तीचा दस्तऐवज वैध असण्यासाठी तो कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात वार्षिक सर्वसाधारण सभेपूर्वी किमान ४८ तास आधी जमा केला गेला पाहिजे.**

कंपनी कायदा, २०१३ (''कायदा'') च्या कलम १०८च्या अनुषंगाने व त्यासोबत वेळोवेळी सुधारणा करण्यात आलेल्या कंपन्या (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ च्या सहवाचनांतर्गत आणि सेक्युरिटिज् अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स, २०१५ मधील विनियम ४४ अंतर्गत कंपनी आपल्या सभासदांना ई-व्होटिंगची सुविधा उपलब्ध करून देत आहे. सभासदांच्या नोंदवहीत किंवा डिपॉझिटरिज्नी ठेवलेल्या लाभार्थी मालकांच्या नोंदवहीत ज्या व्यक्तीचे नाव मंगळवार दिनांक १९ सप्टेंबर २०१७ रोजी (कट-ऑफ डेट) नोंदविलेले असेल, फक्त तीच व्यक्ती रिमोट ई-व्होटिंगची तसेच वार्षिक सर्वसाधारण सभेच्या ठिकाणी मतदान करण्याची सुविधा प्राप्त करु शकेल.

वार्षिक अहवाल पाठवून झाल्याच्या तारखेनंतर जर कोणतीही व्यक्ती कंपनीची सभासद होऊन अंतिम तारखेस (कट-ऑफ डेट) भाग धारण करीत असेल, तर तो/ती तिचा नोंदणीकृत फोलिओ क्र./डीपी आयडी आणि क्लाएंट आयडीचा उल्लेख करून, या सूचनेची प्रत, वार्षिक अहवाल आणि ई-व्होटिंग प्रपत्र प्राप्त करण्यासाठीची तिची मागणी निबंधक आणि हस्तांतरण अभिकर्ता - कारवी कॉंप्युशेअर प्रायव्हेट लिमिटेड यांच्याकडे पाठवू शकेल.

रिमोट ई-व्होटिंग शुक्रवार २२ सप्टेंबर २०१७ रोजी (सकाळी १०.०० वाजता भाप्रवे) सुरू होऊन सोमवार २५ सप्टेंबर २०१७ रोजी (सायंकाळी ५.०० वाजता भाप्रवे) संपेल, ज्यातंनर रिमोट ई-व्होटिंगसाठी परवानगी देण्यात येणार नाही. त्यानंतर रिमोट ई-व्होटिंग मॉड्यूल कारवीकडून मतदानाच्या दृष्टीने निष्क्रिय करण्यात येईल. कोणत्याही ठरावा/वांवर सभासदाने रिमोट ई-व्होटिंगच्या माध्यमातून मत दिले की त्यानंतर ते त्याला/तिला बदलता येणार नाही. रिमोट ई-व्होटिंग ऐच्छिक आहे. मतदान करण्याच्या पद्धतीविषयीचे तपशील कंपनीच्या www.rinfra.com ह्या संकेतस्थळावर आणि रिमोट ई-व्होटिंग अभिकरणाच्या https://evoting.karvy.com ह्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात आलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेत उपलब्ध आहेत.

मतदान करण्याची सुविधा, जे सभासद वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित असून ज्यांनी आधीच त्यांचे मत रिमोट ई-व्होटिंगच्या माध्यमातून दिलेले नसेल, त्यांना उपलब्ध असेल. रिमोट ई-व्होटिंगच्या माध्यमातून मतदानाचा हक्क बजावल्यानंतरही सभासद वार्षिक सर्वसाधारण सभेत सहभागी होऊ शकेल, पण त्याला/तिला या सभेत पुन्हा मतदान करण्याची परवानगी देण्यात येणार नाही.

संचालक मंडळाने श्री. अनिल लोहिया किंवा त्यांच्या अनुपस्थितीत श्री. रिंकित किरण उचाट, भागीदार, मेसर्स दयाल अँड लोहिया चार्टर्ड अकाऊंटंटस् ह्यांची मतदानाच्या प्रक्रियेची छाननी करण्यासाठी छाननीकार म्हणून नियुक्ती केलेली आहे.

मतदानाचे निकाल जाहीर करून ते वार्षिक सर्वसाधारण सभा संपल्यानंतर अठ्ठेचाळीस तासांच्या आत बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड ह्यांना कळविण्यात येतील आणि ते छाननीकारांच्या अहवालासहित कंपनीच्या संकेतस्थळावर (www.rinfra.com) आणि (www.karvy.com) कारवी ह्यांच्या संकेतस्थळावर अपलोड केले जातील.

अन्य बाबींबरोबरच वित्तीय विवरणे आणि अहवाल यांचे संपूर्ण संच असलेला संक्षिप्त आणि संपूर्ण वार्षिक अहवाल, या कायद्याच्या कलम १३६ अनुसार प्राप्त करण्यास अन्यथा पात्र असलेल्या कोणत्याही व्यक्तीने त्यासाठी लेखी विनंती केल्यासही उपलब्ध असेल. यासाठी सभासद कंपनीला तिच्या नोंदणीकृत कार्यालयाच्या पत्त्यावर किंवा निबंधक आणि हस्तांतरण अभिकर्ता - कारवी कॉंप्युशेअर प्रायव्हेट लिमिटेड (युनिट: रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड), कारवी सेलेनिअम, टॉवर-बी, भूखंड क्र. ३१ आणि ३२, सर्वेक्षण क्र. ११६/२२, ११५/२४, ११५/२५, फायनान्शिअल डिस्ट्रिक्ट नानकरामगुडा, हैद्राबाद ५०० ०३२ ह्यांच्याकडेही लिहून कळवू शकतील. संपूर्ण वार्षिक अहवाल कंपनीच्या www.rinfra.com ह्या संकेतस्थळावरही पाहिला जाऊ शकतो.

ह्या कायद्याच्या कलम ९१ अंतर्गत कंपन्या (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४, सिक्युरिटीज आणि भारताचे विनिमय बोर्ड (नियतकालिन दायित्व आणि प्रकटीकरण आवश्यकता) विनिमय ४२, २०१५ मधील नियम १० च्या अंतर्गत याद्वारे अशीही सूचना देण्यात येते की, कंपनीची सभासद नोंदवही आणि समभाग हस्तांतरण पुस्तिका वार्षिक सर्वसाधारण सभेच्या अनुषंगाने आणि ३१ मार्च २०१७ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षासाठी भागधारकांची लाभांशासाठीची पात्रता निश्चित करण्याकरिता शनिवार दिनांक १६ सप्टेंबर २०१७ ते मंगळवार दिनांक २६ सप्टेंबर २०१७ (दोन्ही दिवस समाविष्ट) बंद राहतील.

रिमोट ई-व्होटिंगच्या बाबतीतील शंका/तक्रारी कंपनी सचिवांकडे, कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयाकडे पाठवून किंवा rinfra.investors@relianceada.com या ई-मेलवर पाठवून कळविता येतील.

ठिकाण: मुंबई
दिनांक: २९ ऑगस्ट २०१७

रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडकरिता
रमेश शेणॉय
कंपनी सेक्रेटरी

**रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड**
नोंदणीकृत कार्यालय: एच ब्लॉक, १ला मजला, धीरूभाई अंबानी नॉलेज सिटी, नवी मुंबई - ४०० ७१०.
दूरध्वनी : +९१ २२ ३३०३ १०००, फॅक्स : +९१ २२ ३३०३ ३६६४
संकेतस्थळ: www.rinfra.com, ई-मेल: rinfra.investor@relianceada.com
सीआयएन : एल७५१००एमएच१९२९पीएलसी००१५३०